**<u>ठळक बातम्या</u>**

- जागतिक आरोग्य दिनानिमित्त देशभरात विविध जनजागृतीपर कार्यक्रम

- राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू पोर्तुगाल आणि स्लोव्हाकियाच्या दौऱ्यावर

- अमेरिकेच्या टॅरिफ धोरणांमुळे शेअर बाजारांमधे मोठी घसरण/ मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्सची ३ हजारपेक्षा जास्त अंकांनी घसरगुंडी

**आणि**

- आयएसएसएफ नेमबाजी विश्वचषक स्पर्धेत १० मीटर एअर रायफलमध्ये रुद्रांक्ष पाटीलनं पटकावलं सुवर्ण पदक

**<><><><><>**

आरोग्यविषयक जागरूकता वाढविण्यासाठी आज जगभरात सर्वत्र आरोग्य दिवस साजरा केला जात आहे. जागतिक आरोग्य संघटनेची स्थापना १९४८ मध्ये या दिवशी झाली. या वर्षीच्या आरोग्य दिवसाची मध्यवर्ती संकल्पना निरोगी सुरुवात, आशादायक भविष्य अशी आहे. माता आणि नवजात बालकांच्या आरोग्यावर लक्ष केंद्रित करणं हा या संकल्पनेमागचा हेतू आहे. येत्या आंतरराष्ट्रीय योग दिवसाला ७५ दिवस उरलेले असताना आयुष मंत्रालयांतर्गत मोरारजी देसाई योग संस्थेनं आजपासून ७५ दिवसांच्या योग महोत्सवाचं ओडिशामध्ये भुवनेश्वर इथं आयोजन केलं आहे.

जागतिक आरोग्य दिनानिमित्त आज महाराष्ट्रात विविध उपक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. मुंबईत महाराष्ट्र आरोग्य सन्मान सोहळा-२०२५ या कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं असून यावेळी आरोग्य सेवा क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या संस्थांचा गौरव करण्यात येणार आहे तसंच विविध

आरोग्य सेवा योजनांचा प्रारंभही करण्यात येणार आहे. ६ जिल्ह्यांमधे डायलिसिस सुविधेचं उद्घाटन, ई सुश्रुत या संकेतस्थळाचा विस्तार, शुश्रुषागृह नोंदणी प्रणालीचं ऑनलाईन प्रमाणपत्र वितरण, इत्यादी उपक्रमांचा त्यात समावेश आहे. अधिक सुदृढ आणि निरोगी जग निर्माण करण्याचा संकल्प प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी जागतिक आरोग्य दिनानिमित्त दिलेल्या संदेशात पुन्हा एकदा व्यक्त केलं आहे. कोणत्याही प्रगतीशील समाजाचा पाया आरोग्य हाच असतो, असं त्यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

केंद्रीय आयुष मंत्रालयाने मोरारजी देसाई राष्ट्रीय योग संस्थानाच्या सहकार्याने आज सकाळी कलिंगा मैदानात योग महोत्सवाचं आयोजन केलं होतं. केंद्रीय आरोग्य आणि कुटुंबकल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते या महोत्सवाचं उद्घाटन झालं. यंदाच्या आंतरराष्ट्रीय योग दिनाला ७५ दिवस बाकी असताना सुरू केलेल्या उलटी गिनती या कार्यक्रमाविषयी प्रतापराव जाधव यांनी अधिक माहिती दिली.

**होल्ड बाईट - प्रतापराव जाधव (२३ सेकंद)**

**<><><><><>**

नौदल कमांडर्स परिषद २०२५च्या पहिल्या आवृत्तीच्या दुसऱ्या टप्प्याला आज नवी दिल्लीत सुरुवात झाली. या परिषदेत सर्वोच्च पदावरच्या नौदल अधिकाऱ्यांमध्ये धोरणात्मक तसंच प्रशासकीय मुद्द्यांवर चर्चा होणार आहे. चार दिवस चालणाऱ्या या परिषदेत हिंद महासागर क्षेत्रातल्या भारतीय नौदलाच्या भूमिकेला बळकटी मिळण्याच्या दृष्टीनेही चर्चा होणार आहे.

**<><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू पोर्तुगाल आणि स्लोव्हाकियाच्या दौऱ्यावर असून काल त्या  पोर्तुगालमध्ये पोहोचल्या आहेत.  पोर्तुगाल दौऱ्यात राष्ट्रपती मुर्मू पोर्तुगालच्या

राष्ट्रपती मार्सेलो रेबेलो डी सौसा यांची भेट घेऊन शिष्टमंडळस्तरीय चर्चा करतील. पोर्तुगालचे प्रधानमंत्री लुईस मॉन्टेनेग्रो आणि त्यांच्या संसदेचे प्रमुख जोस पेड्रो अगुइर-ब्रँको यांचीही त्या भेट घेणार आहेत. गेल्या २७ वर्षांमधली भारताच्या राष्ट्रपतींची ही पहिली पोर्तुगाल भेट आहे. या भेटीमुळे भारताच्या पोर्तुगालसोबतच्या संबंधांना नवी चालना मिळेल.

स्लोव्हाकिया दौऱ्यात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू स्लोव्हाकियाचे राष्ट्राध्यक्ष पीटर पेलेग्रिनी आणि प्रधानमंत्री रॉबर्ट फिको यांच्याशी द्विपक्षीय चर्चा करतील.

**<><><><><>**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी नवं कर धोरण लागू केल्यानंतर व्यापारविषयक चर्चा सुरू करण्यासाठी पन्नासहून अधिक देशांनी व्हाईट हाऊसशी संपर्क साधला आहे. यामुळे गेल्या आठवड्यात शेअर्सचं मूल्य घसरल्यानं अमेरिकेचं सुमारे ६ ट्रिलियन डॉलर्सचं नुकसान झालं असलं तरी ट्रम्प प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या शुल्काला आपला पाठिंबा कायम ठेवला आहे. गेल्या बुधवारच्या घोषणेनंतर ५० हून अधिक देशांनी अमेरिकेशी वाटाघाटी सुरू केल्या आहेत. तैवानचे राष्ट्राध्यक्ष लाई चिंग ते यांनी व्यापारी चर्चेचा पाया म्हणून शून्य शुल्काचा प्रस्ताव ठेवला असून व्यापारातील अडथळे दूर करण्यासाठी प्रयत्नशील राहण्याचं स्पष्ट केलं आहे. तैवानच्या कंपन्यांकडून अमेरिकेतील गुंतवणूक वाढविण्याचं आश्वासन दिलं असल्याचं अर्थमंत्री स्कॉट बेसेंट यांनी एका वृत्तवाहिनीशी बोलताना सांगितलं. ट्रम्प यांनी विश्लेषक आणि गुंतवणूकदारांच्या अपेक्षेपेक्षा अधिक आक्रमक जागतिक शुल्क प्रणालीची घोषणा केल्यानंतर दोन दिवसांत अमेरिकन शेअर्स सुमारे १० टक्क्यांनी घसरले. विश्लेषक आणि मोठ्या गुंतवणूकदारांनी शेअर बाजारातील या घसरणीला ट्रम्प यांची शुल्कवाढ जबाबदार असल्याचं म्हटलं असून, महागाई वाढण्याचा आणि आर्थिक विकासाला हानी पोहोचण्याचा धोका

असल्याची भीती बहुतेक अर्थतज्ज्ञ आणि अमेरिकन फेडरल रिझर्व्हच्या प्रमुखांनी व्यक्त केली आहे.

**<><><><>**

भारतीय शेअर बाजारावर आज आठवड्याच्या सुरुवातीलाच तीव्र घसरण पाहायला मिळाली आहे. मुंबई शेअर बाजाराचा सेन्सेक्स तीन हजारांपेक्षा जास्त अंकांनी घसरला असून निफ्टी १ हजारांहून अधिक अंकांनी घसरला आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी जाहीर केलेल्या टॅरिफ घोषणांमुळे व्यापार क्षेत्रात तयार झालेला ताण आणि अमेरिकेत मंदी येण्याच्या भीतीचा तीव्र परिणाम भारतीय शेअर बाजारांवर दिसत आहे.

सध्या सेन्सेक्स ३ हजार ३००पेक्षा जास्त अंकांनी घसरून ७२ हजार ६६ अंकांच्या आसपास व्यवहार करतो आहे. तर निफ्टीही १ हजारापेक्षा जास्त अंकांनी घसरून २१ हजार ८०० अंकांच्या आसपास व्यवहार करतो आहे.

**<><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी येत्या २७ एप्रिल रोजी मन की बात या कार्यक्रमाद्वारे आकाशवाणीवरुन देशोदेशीच्या श्रोत्यांशी संवाद साधणार आहेत. हा या कार्यक्रमाचा १२१वा भाग असेल. कार्यक्रमाकरता आपल्या सूचना किंवा प्रश्न १८०० – ११ – ७८०० या टोलफ्री क्रमांकावर नोंदवता येतील. नरेंद्र मोदी ॲप किंवा मायगोव्ह ओपन फोरम द्वारे देखील सूचना नोंदवता येतील. येत्या २५ तारखेपर्यंत येणाऱ्या सूचनांचा विचार करण्यात येईल.

**<><><><>**

रिझर्व्ह बँकेच्या चलनविषयक धोरण समितीची तीन दिवसीय बैठक आजपासून मुंबईत सुरु झाली. २०२५-२६ या आर्थिक वर्षातली ही पहिलीच बैठक आहे. या बैठकीत रेपो दरांवर चर्चा होईल. सध्या रेपो दर ६ पूर्णांक २५

दशांश टक्के असून या बैठकीत या दरात होणाऱ्या बदलांवर अर्थतज्ञ आणि बाजार विश्लेषकांचं लक्ष आहे.

**<><><><>**

प्रधानमंत्री मुद्रा योजने अंतर्गत आजपर्यंत ३२ लाख कोटीपेक्षा जास्त रकमेच्या कर्जाचे ५२ कोटीहून अधिक अर्ज मंजूर करण्यात आले आहेत.  यापैकी ७० टक्के कर्ज महिला उद्योजकांनी घेतल्याचं आकडेवारीतून समोर आलं आहे. तर एकूण कर्जापैकी ५० टक्के कर्ज अनुसूचित जाती, जमाती  आणि इतर मागास वर्ग प्रवर्गातल्या उद्योजकांनी घेतलं आहे. लघु उद्योजकांना सक्षम करण्यासाठी ही योजना २०१५ पासून सुरू करण्यात आली आहे.

**<><><><>**

भारताचा टेनिसपटू रोहण बोपन्ना आणि त्याचा अमेरिकन जोडीदार बेन शेल्टन यांनी फ्रान्समधे सुरू असलेल्या मोन्ते कार्लो मास्टर्स स्पर्धेच्या उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला आहे. बोपन्ना आणि शेल्टन यांनी काल झालेल्या सामन्यात अर्जेंटिनाचा फ्रान्सिस्को सेरुंडोलो आणि चिलीचा अलजेन्द्रो यांचा ६-३, ७-५ असा पराभव केला. उपांत्यपूर्व फेरीत या जोडीचा सामना इटालीयन खेळाडू सिमोन बोलेल्ली आणइ अंद्रेया वावासोरी यांच्याशी उद्या होणार आहे.

पुरूष दुहेरीच्या पहिल्या फेरीत भारताचा युकी भांबरी आणि त्याचा जोडीदार अलेक्सी पोपेरीन यांचा सामना जर्मनीचा जान-लेनार्ड स्ट्रफ आणि ऑस्ट्रेलियाचा ॲलेक्स    डी मिनौर यांच्याशी आज होणार आहे.

**<><><><>**

विश्वविजेता रुद्रांक्ष पाटील यानं ब्युनोस आयर्स इथं सुरू असलेल्या आयएसएसएफ नेमबाजी विश्वचषक स्पर्धेत १० मीटर एअर रायफलमध्ये पुरुषांच्या गटात सुवर्ण पदक पटकावलं. भारताचं या स्पर्धेतील हे दुसरं सुवर्ण पदक असून या स्पर्धेत भारताच्या खात्यात आतापर्यंत ४ पदकं जमा झाली आहेत. महाराष्ट्राच्या

रुद्रांशने अंतिम फेरीत २५२ पूर्णांक ९ गुणांचा वेध घेतला. विश्वचषक स्पर्धेतील हे त्यांचे दुसरे वैयक्तिक सुवर्णपदक आहे.

**<><><><><>**

भारतीय हवामानशास्त्र विभागाने महाराष्ट्र, मध्य प्रदेश आणि ओदिशातल्या २१ शहरांना उष्णतेच्या लाटेचा इशारा दिला आहे. बिहार आणि उत्तर प्रदेशासह अन्य भागांतही उष्णतेच्या झळा तीव्र होण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. गुजरातमध्ये कच्छ आणि सौराष्ट्रमध्ये आज उष्णतेच्या लाटेचा रेड अलर्ट देण्यात आला आहे. या भागांमध्ये रात्रीही तापमान जास्त राहण्याची शक्यता आहे. पश्चिम राजस्थानाला ऑरेंज अलर्ट देण्यात आला असून उर्वरित गुजरात, उर्वरित राजस्थान, हिमाचल प्रदेश, पंजाब, हरयाणा आणि उत्तर प्रदेशाचा पश्चिम भाग यांना यलो अलर्ट देण्यात आला आहे. कोकण आणि गोव्यात उष्ण आणि दमट वातावरण राहण्याची शक्यता आहे.

**//<><><><><>//**